नि १७

**श्रीगोंदा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब सि.डी.**

**यांचे कोर्टात...**

**<u>रे. मु. नं. 280/2024</u>**

**<u>वादी</u>**

**मधुकर कारभारी शिंदे**

**विरूध्द**

**<u>प्रतिवादी</u>**

**अशोक कारभारी शिंदे व इतर**

**<u>या कामी प्रतिवादी नं. 1 व 2 तर्फे दाव्यास कैफियत व मनाई हुकूमाचे अर्जास म्हणणे खालील प्रमाणेः</u>**

1) वादी यांनी दाखल केलेला दावा व त्यातील मजकूर हा खोटा, चुकीचा, लबाडीचा व बेकायदेशीर असून, या प्रतिवादीनां मुळीच मान्य व कबूल नाही.

2) वादी यांनी दाखल केलेला दावा कायदेशिर नाही, मेन्टेनेबल नाही, सबब सदरचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

3) वादीस अशा प्रकारचा दावा दाखल करण्यास कोणतेही योग्य, रास्त व संयुक्तीक कारण नाही, सबब सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

4) वादीने केलेला सदरचा दावा मुदतबाह्य असल्याने, सदरचे दाव्यास लिमिटेशन ॲक्टमधील तरतुदीची बाधा येत असल्याने सदरचा दावा आहे त्या परीस्थितीत रद्द होण्यास पात्र आहे.

Order

The defendant number 1 & 2 have filed this written statement through e-filling. Affidavit is not produced. The defendant number 1 & 2 are served with summons on 2-12-2024. W.S. is filed after period of 30 days from date of service of summons, however reasons are not explained by them, as per order 8 Rule 1 CPC. Hence defendant 1 & 2 are to argue on point of maintainablity of written statement.

KIRTI ATMARAM KATKAR

Digitally signed by KIRTI ATMARAM KATKAR
Date: 2025.02.17 17:36:02 +0530

5) वादीने दाव्यात आवश्यक ते पक्षकार सामिल केलेले नाहीत, त्यामुळेही सदरचा दावा कायद्याप्रमाणे चालू शकत नाही, सबब सदरचा दावा आहे त्या परीस्थितीत खर्चासह रद्द करण्यात यावा.

6) वादीने दाव्यात कलम 1 नमुद केलेले मिळकतीचे वर्णन व वादी व प्रतिवादी यांची दावा कलम 2 मध्ये दिलेली वंशावळ खरी व बरोबर आहे. परंतू सदर वंशावळीतील नातेसंबंधाबाबत दाव्यात नमुद केलेली कथने खरी व बरोबर नसल्याने या प्रतिवादीस मान्य व कबुल नाहीत.

7) वादीचे दावा कलम 3 मधील नमुद केलेली कथने खरी व बरोबर नसून ती या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही, कबुल नाही.

8) वादीचे दावा कलम 4 मधील नमुद केलेल्या व्यवहाराबाबतची नमुद केलेली कथने कपोलकल्पीत, काल्पनिक स्वरुपाची असल्याने ती या प्रतिवादीस मुळीच मान्य नाहीत व कबुल नाहीत.

9) तसेच वादीचे दावा कलम 5, 6 मध्ये केलेली कथने सुध्दा खोटी, लबाडीची व काल्पनिक स्वरुपाची असून ती या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही, कबुल नाहीत. सदर वादीने दाव्यात नमुद केलेली संपुर्ण कथने वादीने सक्तरितीने शबित करावीत.

10) वादीने दावा कलम 7 मध्ये नमुद केलेले दाव्याचे कारण खरे व बरोबर नसल्याने या प्रतिवादीस मुहीच मान्य नाही, कबुल नाही.

11) वादीने दावा कलम 8 मध्ये केलेला दाव्याचा आकार व त्या अनुषंगाने दाव्यास लावलेला कोर्ट फि स्टॅम्प खरा व बरोबर नसून तो या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही, कबुल नाहीत.

12) वादीचे दावा कलम 9 मध्ये केलेली विनंती, मागणी खरी व बरोबर नसल्याने ती या प्रतिवादीस मुळीच मान् य नाही, कबुल नाही.

13) वादीने दाखल केलेला दावा व त्यातील कथने मुलतः खोटी व बनावट स्वरुपाची असल्याने दाव्यात मागणी केल्याप्रमाणे कोणताही मनाई हुकुम मागण्याचा व मिळण्याचा वादीस कुठलाही हक्क व अधिकार नाही सबब सदराचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

14) **<u>वास्तविक पाहता सत्य परीस्थिती अशी आहे की,-</u>** सदर वादी व प्रतिवादी नंबर 1 व प्रतिवादी नंबर 2 चे मयत वडिल असे एकमेकांचे सख्खे भाऊ असून, दावा मिळकती या एकत्र कुटुंबांची वडिलोपार्जित मालकी हक्क, कब्जा वहिवाटीच्या होत्या व आहेत. सदर मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीत असून, सदर मिळकतीमध्ये सामाईकात बोअर, पाईपलाईन केलेली असून, त्याचा खर्च देखील सामाईक स्वरुपात केलेला होता व आहे. प्रतिवादी नंबर 2 यांचे वडिल मयत झाल्याने प्रतिवादी नंबर 2 हे तलाठी ऑफिस, ग्रामपंचायत कार्यालय, विसापुर येथे वारस नोंदीसाठी येत जात असल्याने त्याबाबत शंका उपस्थितत करुन सदरचा तथाकथीत दावा या मे.कोर्टाने वादीने आणलेला आहे. सदर वादी व प्रतिवादी यांचे कुटुंबाचा विस्तार झालेला असल्याने सदरचे वादी व प्रतिवादी

यांना मिळकतीमध्ये एकत्रात वहिवाट करुन मिळकतीचा उपभोग घेण्यास अडचणी निर्माण होवू लागल्या आहेत व सदर मिळकतीचे वहिवाटीवरुन एकमेकांत वाद, तक्रारी होवू लागलेल्या असल्याने, सदरचे वादी म्हणतात तसे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने दिशा दाखवून वाटप होवून, ज्याचे त्याचे हिस्से ज्याचे त्याचे ताब्यात वहिवाटीकरीता मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. सदरचे प्रतिवादी हे वादीस त्याचे मागणीप्रमाणे दावा मिळकतीमधील हिस्सा देण्यास तयार आहेत, तरीही वादीने सदरचा खोटा, व बनावट स्वरुपाचा दावा केलेला आहे.

15) परंतु सदर वादीने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे या प्रतिवादीने मिळकतीचे खरेदी, विक्रीबाबत कधीही कोणाही बरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नव्हता व नाही, अगर तसा प्रतिवादीचा प्रयत्न देखील नाही. त्यामुळे सदर वादीने दाव्यात मागणीकेल्याप्रमाणे या प्रतिवादीचे विरुध्द मनाई हुकुम मागण्याचा किवा मिळण्याचा वादीस हक्क व अधिकार नाही. सदर प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन घेण्यास तयार असल्याने व प्रतिवादी हे कोणतीही मिळकत विक्री करीत नसल्याने वादी म्हणतात असा दाव्यात मनाई हुकुमाची कोणतीही आवश्यकता नाही. उलटपक्षी सदर दावा हा मा. न्यायालयात दाखल करण्यापुर्वी आपआपसात वाटप झाले असते, परंतू वादीने तसे न करता सदरचा तथाकथीत दावा वादीने या न्यालयात दाखल केलेला आहे. सदरचा दाव्यातील वादा संदर्भात दावा दाखलपुर्व देखील वादाचे आपसात निराकरण झाले असते. मात्र तसा

कोणताही वादीने प्रयत्न न करता, सदरचा दावा या न्यायालयात दाखल करुन या प्रतिवादीस नाहक कोर्ट दरबारात अडकवून मानसिक, शारीरीक व आर्थिक असा त्रास दिलेला असल्याने वादीचा दावा खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे.

16) वादी यांनी दाव्यात केलेले कथना प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. प्रतिवादीने वादीचे ताब्यातील मिळकतीस कधीही कोणत्याही प्रकारचा हरकत अडथळा केलेला नाही, अगर मिळकतीबाबत कोणाशीही कोणतीही बोलणी केलेली नाही, त्यामुळे वादीने दाव्यात केलेले कथन हे पुर्णपणे खोटे व चुकीचे आहे. वादी यांनी ढोबळ स्वरूपाचे कथन केलेले आहे.

17) वादी यांनी प्रतिवादीं विरुध्द खोटा, चुकीचा व बेकायदेशीर दावा प्रतिवादीनां त्रास देण्याचे हेतुने दाखल केलेला आहे. सदर दाव्या मुळे प्रतिवादींना मानसिक त्रास झालेला आहे व आर्थिक नुकसान झालेले आहे. सबब प्रतिवादी यांना वादीकडून कॉम्पेन्सेटरी कॉस्ट रक्कम रुपये- 50,000/- देण्याचा आदेश करणे आवश्यक होते, परंतु सदर वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे सख्खे भाऊ असल्याने व आपसात कोणताही वाद नसल्याने, व एकमेकांचे आर्थिक नुकसान होवू नये म्हणून सदर दाव्यात कोणतीही कॉस्ट नकरता योग्य तो न्यायनिर्णय करणेत यावा.

18) येणेप्रमाणे प्रतिवादी नंबर 1 व 2 यांचेतर्फे वादीचे दाव्याची कैफियत व मनाई हुकुमाचे अर्जास म्हणणे दिले असून, आवश्यकता वाटल्यास वेळेनुसार

जादा कैफियत देण्याची या प्रतिवादी यांना मा. न्यायालयाची परवानगी असावी.

येणेप्रमाणे प्रतिवादी नंबर 1 व 2 यांचे तर्फे वादीचे दाव्याची कैफियत व मनाई हुकुमाचे अर्जास म्हणणे दिले असे. सोबत प्रतिज्ञापत्र दिले असे.

दिनांकः 17 /02/2025
श्रीगोंदा

1)
2)

ॲडव्होकेट
ॲड.S.Y.Patel.

प्रतिवादी क्र.1 व 2

**प्रतिज्ञालेख**

आम्ही प्रतिवादी क्र. 1 व 2 कारणे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतोत की, सदर कैफियतीचे पॅरा कलम 1 ते 14 मधील सर्व मजकूर हा आमच्या माहीती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याच्या सत्यतेसाठी आम्ही आजरोजी अहमदनगर मुक्कामी याखाली आमच्या सह्या करून सदरचा प्रतिज्ञालेख पुर्ण केला असे.

दिनांकः 17 /02/2025

श्रीगोंदा

1)
2)

प्रतिवाद क्र. 1 व 2